# डॉ. सुहासिनी इर्लेकर यांची बालकविता

**डॉ. घोलप बापू गणपत**
**मु. पो. लिंबागणेश, ता.जि. बीड - ४३१ १२६**
**E mail: gbapug@yahoo.in Mobi :०७५८८०५७६९५**
**Web: www.shreebhalchandra.com**

**प्रास्ताविक :-**

मराठी साहित्याचाा विचार करता मराठीतील वाङ्मय प्रकारांनी आपआपल्या वेगळा असा ठसा उमटविला आहे. त्यात मराठी कविता, नाटक, कादंबरी, चरित्र, आत्मचरित्र, ललित इ. सारख्या वाङ्मयप्रकारात अनेक लेखक, कविंनी आपल्या सृजनात्मकतून आपले विचार व्यक्त केलेले आहेत. मराठी साहित्य प्रकारात कवितेचा विचार करता कविंनी वेगवेगळ्या प्रकारांची कविता लिहून लहान-थोरांना, वाचक-समीक्षक अभ्यासकांना बोध आणि मनोरंजनादी विचार दिलेले आहेत. विशेषत: बालकवी, विंदा करंदीकर, मंगेश पाडगांवकर इ. कवींचा उल्लेख आपणाला करता येतो.

१९६० नंतर मराठवाड्यातील सुप्रसिध्द कवयित्री डॉ. सुहासिनी इर्लेकर यांनी आपल्या काव्यप्रतिभेच्या सृजनात्मक दृष्टितून 'बालकविता' साकारली आहे. लहान मुलासाठी लेखन करीत असतांना त्यांच्या भावविश्वात एकरुप होणं, मिसळून जाणं याला महत्व असतं. याचं भान लेखकाला नेहमी ठेवावं लागतं. नाही ठेवलं तर कृत्रिमता नकळतपणे मानगूटीवर बसते. त्यातून र ला ट आणि ट ला र चा जन्म होतो. पाटीभर लेखनातून मग चांगलं काय आणि निकृष्ट काय कळत नाही. मुलांसाठी लेखन करणाऱ्या वर्तमान काळातील लेखकाची अशीच फसगत झालेली दिसून येते. परंपरा आणि नवतेचा शोध घेतांना तो अनुभव गाठीशी बांधण्याची गरज असते. असं आणि तसं म्हणजे आकलन होण्यासाठी नेमक्या भाव विश्वाचा तळ शोधण्याची आवश्यकता असते. सुहासिनी इर्लेकरांच्या बालकवितेचा आणि कुमार कवितेचा विचार करतांना मनात उपस्थित झालेल्या काही प्रश्नांची निश्चितच सकारात्मक उत्तरं आपणाला मिळतात.

डॉ. सुहासिनी इर्लेकर यांनी आपल्या समृध्द कविते प्रमाणेच बालकविताही समृध्दपणे लिहिली. 'मी भारतीय आहे.' (संस्कारगीते), 'आजी आणि शेन वॉर्न', 'पाऊस गाणे', 'डॉक्टर ! डॉक्टर ! आणि दादांची परीक्षा', (नाट्य) हे सुहासिनी इर्लेकर यांचे बालकवितासंग्रह. कवयित्रीच्या भावविश्वात बालकवितेचा हा निर्झर आजीपणाच्या अनुभवातून वाहतांना आपणाला दिसतो. इथे दादा व छकुली कवयित्रीच्या भावविश्वातील आनंद-विभोर असणारे मोरच ते कधी पाऊस होतात तर कधी शीतल चांदणं होऊन कवयित्रीच्या मनाला विश्रांत करतात. सुहासिनी इर्लेकरांची बालकविता ही पारंपरिक बालकवितेला च्छेद देत व्यक्त होते. कवयित्रीची मूळ प्रकृती भावकवितेत, छांदस कवितेत, गीत कवितेत रमलेली मात्र ही बालकविता या अंगाने न प्रकटता ती कधी "दादा व छकुली" च्या बालमनाच्या अनुभवात रमते तर कधी आजीच्या प्रौढ भावविश्वात रमतांना दिसते. तेंव्हा ही कविता दादा च्कुलीची जेवढी आहे तेवढी आजीची आहे. दुहेरी पातळीवरील अनुभवांचा एकात्म भावबंध हा या कवितेचा विशेष आहे

'आजी आणि शेनवॉर्न' म्हणजे छकुली आणि दादाचे आजीसोबतचे बालपण. आजी आणि नातवंडं यांचं घनव्याकुळ आणि पारदर्शी नातं शब्दातून सुहासिनी इर्लेकर आपल्यासमोर मांडतात. मुलांसाठी कविता ही तशी अवघड गोष्ट. ती सुघड करणाऱ्या लेखिकामध्ये सुहासिनी इर्लेकर उजव्या ठरलेल्या आहेत. आजी आणि आजोबा यांचे येणे म्हणजे या दोन चिमुकल्यांचा आनंद. सारं घर डोक्यावर घेऊन नाचणार. ही आजीही कमालीची यात गुंतलेली. आपलं आजीपण खऱ्या अर्थानी फुलून आलं ते बालजिवांमुळे. या संदर्भात आजीचे मनोगत व्यक्त करतांना इर्लेकर म्हणतात की,

"खळखळ वाहणारं तुमचं अजान बालपण
तुमच्या बेरजेनं माझा स्वर्ग ठेंगणा होतो
आणि वजाबाकीनं हाती भोपळा येतो !"[१]

'आजी आणि शेनवॉर्न' मधून नातवंडांच्या बालजगातील आठवणींचा ओलावा सुहासिनीबाईंनी अचूक टिपला आहे.

लहान मुलं आपल्या आजी-आजोबांना सारखे प्रश्न विचारतात. येथेही 'दादा आणि छकुली' आपल्या आजीला प्रश्न विचारतात. आई-बाबांच्या लग्नातील फोटोच्या अल्बममध्ये मी कसी नाही ? शाळेत कशाला जायचं ? पैसे का मिळवायचे ? हा प्रश्नाचा ढीग. मात्र शेवटी आजी अधिक अंतर्मुख झालेली दिसून येते. आणि तिचे उत्तर...

" सुख म्हणजे...
बाळा, सुख म्हणजे सुखच

जे कधीच दिसत नसतं

कधीच मिळतही नसतं..."[२]

वर्तमान स्थिती आणि गती यातील वस्तूस्थिती समोर ठेवून 'आजी आणि शेन वॉर्न' ची निर्मिती झालेली दिसते. एरव्ही च्ंदात रमलेल्या सुहासिनीबाई या बालकवितेत मुक्त च्ंदात खेळतांना दिसतात.

"जागतिक क्रिकेटचा मोसम सुरु

वर्ल्ड कप मॅचेस रस्त्यारस्त्यावर

घराघरापुढे दिसू लागतात

दादालाही क्रिकेट खेळायचय

हातात बॅट घेऊन तो उभा

सचिनच्या पोझमध्ये

पण गोलंदाज भेटत नाही"[३]

मात्र शेवटी आजीबाई म्हणजेच सुहासिनी इर्लेकर गोलंदाजी करतात. वयामानाने दमचक होते.

सुहासिनी बाईंच्या कवितेत आलेली छकु ली लाघवी, गोड, जीवनाबद्दल कुतूहल असणारी. दादावर तिचा कमालीचा जीव. मोठी आई तर तिचा विसावा आणि आई-पप्पा तर तिचा आनंदच. दादा शाळेत जातांना रडवेला. गृहपाठ पूर्ण नाही. तेंव्हा छकुली दादाचे डोळे पुसते.

"तिची कोवळी बोटं किती समजस !

'रडू नको दादा'

असं छकूली रडतच सांगणारी

दादाही मग तिचे अश्रू पुसतो."[४]

'पाऊसगाणे' या बालकवितासंग्रहातील कविता बालकुमार मनातील भावविश्वाला प्रकाशमान करतात. मुलांना पाऊस, टेकडी, पर्वत, डोंगर, पाणवठे, तळे, तलाव, झरे, नदी, आकाश, चंद्र, सुर्य, तारे, पशु-पक्षी, प्राणी, यांचे कमालीचे आकर्षण या बालजगताची कुतूहल. त्यांना पडणारे प्रश्न यांचा शोध घेण्यात इर्लेकर यशस्वी झालेल्या आहेत.'पाऊस' बालजिवांचा लाडका. कवयित्रीच्या सृजनशिलवृत्तीचा स्फूर्तीदाता. मुलांना अतिशय प्रिय असलेला पाऊस. पडणाऱ्या पावसात नाचणे, गाणी गाणे हा केवढा आनंद.

" ना म्हटले मी देईन पैसा

ना झाला पैसाही खोटा(०४)

येरे येरे म्हणता धावत

आल्या पाऊस धारा

आल्या पाऊस धारा "[५]

लहान मुलांना शाळा म्हणजे कटकट, वैताग. अभ्यास लेखन, वाचन, या सर्वांचा या बालमनाला खूप कंटाळा. त्यामूळे त्यांनी लढवलेला युक्तिवाद कवयित्रीने आपल्या शब्दात मांडला आहे.

"पाखरांची किलबिल शाळा

झाडावरच भरते

पाढे, धडे, शुध्दलेखन

त्यांना कुठे असते ? "[६]

डॉ. सुहासिनी इर्लेकर यांची बालकविता ही पारंपरिक बालकवितेला च्छेद देऊन नवे वळण देतांना दिसते. या कवितेला समांतर असणारी चित्रे कवितेच्या भावाशयाला जिवंत करतात. कवयित्रीच्या भावप्रकाशातील बालकधितेचा निर्झर हा आजीपणाच्या अनुभवातून वाहतो. कवयित्रीची मुळ प्रकृती भाविकवितेत, चंदस, गीत कवितेत रमलेली. मात्र ही बालकविता या अंगाने न प्रकटता 'दादा व छकुली' च्या बालमनाच्या अनुभवात रमतांना आजीच्या प्रौढ भावविश्वातही रमते.

डॉ. सुहासिनी इर्लेकरांची बालकविता ही कधी कथात्मतेचा तर कधी नाट्यत्मितेचा आश्रय घेतांना दिसते. एकूणच ही कविता बालमनाचे सुख-दु:खात्मक शब्दांकित करण्यात अधिक रस घेतांना दिसून येते. बालमन आणि वृध्दपण यांचे नाते उलगडून दाखविण्यात सुहासिनी इर्लेकर यशस्वी झाल्या आहेत.

संदर्भ :-१) इर्लेकर सुहासिनी, ' आजी आणि शेन वॉर्न', साकेत प्रकाशन, २००१, पृष्ठ क्र. ०७

२)	तत्रैव, 'छकुलीचा प्रश्न' पृष्ठ क्र. १८
३)	तत्रैव, 'आजीची गोलंदाजी' पृष्ठ क्र. ३४
४)	तत्रैव, 'दादाचं शाळेत जाणं, पृष्ठ क्र. २०
५)	इर्लेकर सुहासिनी, 'पाऊसगाणे' प्रतिभास प्रकाशन, प्रथमावृत्ती फेब्रू. २००६, पृष्ठ क्र. १०
६)	तत्रैव, 'कशासाठी जायचे शाळेत' पृष्ठ क्र. १३